# योग प्रशिक्षकासाठी सुचना

१. योग प्रशिक्षक म्हणून निवड करताना प्रकल्प कृती आराखडा सन २०२३-२४ च्या अन्वये ३१ मार्च २०२४ पर्यंत कंत्राटी नियुक्ती आदेश प्रात्र उमदेवरांना देण्यात येतील.

२. उमेदवारांनी जिल्हा कार्यालयास फक्त आपला अर्ज (हार्ड कॉपी) व भरती प्रक्रिया शुल्काची पावती सादर करावयाची आहे. तसेच **https://forms.gle/WqqP731CExNSx2bm7** या लिंकवर आपला अर्ज भरणे अनिवार्य आहे.

३. पात्र/अपात्र यादीतील उमेदवारांची यादी जिल्हा परिषद सातारा यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द झालेनंतर ४८ तासाच्या मुदतीत (दि.०६-०९-२०२३ पर्यंत) अपात्र ठरलेल्या उमेदवारांनी " शेरा" या रकाण्यातील दर्शवलेल्या त्रुटीनुसार आपली हरकत असल्यास yogat2324@gmail.com ई मेलवर आवश्यक असणाऱ्या मुळ कागदपत्राची "स्कॅन कॉपी" सादर करावी.

४. ४८ तासानंतर येणाऱ्या कोणत्याही उमेदवाराची हरकत/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही/तसेच कोणत्याही पदाधिकारी यांचे मार्फत त्याबाबतची शिफारस करु नये.

५. ४८ तासानंतर जी यादी प्रसिध्द करणेत येईल त्याच उमेदवारांना मुळ कागदपत्र पडताळणी, मुलाखत व प्रात्यक्षिक व समुपदेशनासाठी दि. १२-०९-२०२३ रोजी बोलविणेत येईल.

६. उमेदवारांनी जिल्हा परिषद सातारा आरोग्य विभागामार्फत प्रसिध्द होणाऱ्या निवेदन/सुचना या जिल्हा परिषद सातारा यांचे www.zpsatara.gov.in या संकेत स्थळावर वेळोवेळी अवलोकन करावे व इतर कोणत्याही बाबीचे जिल्हा कार्यालयास प्रत्यक्ष माहिती मागवू नये.

७. भरती प्रकियेतील पुढील टप्पे खालील प्रमाणे-

| अ.क्र. | दिनांक | तपशिल |
|---|---|---|
| १ | २२-०८-२०२३ | वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द |
| २ | ३०-०८-२०२३ | अर्ज स्विकारण्याची अंतिम दिनांक सायंकाळी ०४.०० वाजेपर्यंत |
| ३ | ०४-०९-२०२३ | अर्ज छाननी करुन पात्र/अपात्र प्राथमिक यादी |
| ४ | ०६-०९-२०२३ | हरकती नोंदविणेसाठी कालावधी सायंकाळी ०४.०० वाजेपर्यंत |
| ५ | ०७-०९-२०२३ | अंतिम पात्र/अपात्र यादी |
| ६ | १२-०९-२०२३ | पात्र उमेदवारांची प्रात्यक्षिक व मुलाखत व समुपदेशन प्रक्रिया |
| ७ | १४-०९-२०२३ | पात्र उमेदवारांना कंत्राटी नियुक्ती आदेश |

- **योग प्रशिक्षकांनी मुलाखत / प्रात्याक्षिक दरम्यान भरलेला फॉर्मची एक प्रत व योगप्रशिक्षणासंबंधी मुळ कागदपत्रे** (Degree, Diploma, Certificate Course, Govt. Experience Certificate) **प्रत्यक्ष सादर करावयाची आहे. मुळ कागदपत्रे सादर न केल्यास भरती प्रक्रियेतुन आपणास कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्यात येईल.**
- भरती प्रक्रियेमध्ये पुढील प्रमाणे गुणानुक्रमे (Merit) ठरविले जाईल.

(Degree ⟶ Diploma ➝ Certificate Course + Govt.Experience Certificate) या प्रमाणे ठरविण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| अ | योग पदवी असल्यास | १० गुण |
| ब | योग डिप्लोमा असल्यास | ६ गुण |
| क | सर्टिफिकेट कोर्स असल्यास | ४ गुण |
| ड | शासकीय संस्थेतील प्रत्येक ६ महिन्यांसाठी १ गुण असे अधिकतम१०गुण | १०गुण |
| | **एकूण गुण** | **३० गुण** |

- जाहिरातीनुसार रिक्त असलेल्या आरोग्यवर्धिनी केंद्रावर व अंतिम यादीनुसार उमेदवारांना मेरिटप्रमाणे समुपदेशना करिता बोलविले जाईल. समुपदेशनामध्ये गुणानुक्रमे पात्र उमेदवारांना रिक्त असणाऱ्या ठिकाणी नियुक्ती आदेश देणेत येतील. **जे उमेदवार नियुक्तीसाठी इच्छुक नसतील त्यांचा नकार गृहीत धरुन तात्काळ त्याच दिवशी नकारपत्र भरुन देणे अनिवार्य राहील**. त्यामुळे उमेदवारांने विचारांती निर्णय घ्यावा.
- समुपदेशनपश्चात देणेत आलेल्या आरोग्यवर्धिनी केंद्रानुसार कंत्राटी नियुक्ती आदेश ई मेल /प्रत्यक्ष देणेत येतील.
- मेरीट यादीत एखाद्या उमेदवाराचे समगुण झाल्यास खालीलप्रमाणे मेरीट प्राध्यान्यक्रमाचे निकष राहतील. तदनंतरच अंतिम यादी प्रसिध्द करणेत येईल.
  1) पदवीच्या (Degree) अंतिम वर्षाचे गुण
  2) पदवीका (Diploma) अंतिम वर्षाचे गुण
  3) जन्मतारीख
- कंत्राटी नियुक्ती आदेशात कोणत्याही प्रकारे नियुक्तीचे ठिकाण बदलुन दिले जाणार नाही. त्यामुळे समुपदेशनाने नियुक्ती दिल्यानंतर नियुक्ती ठिकाण बदलणेसाठी या कार्यालयास पत्र व्यवहार /विनंती अर्ज /पदाधिकारी यांचेमार्फत शिफारस करु नये.
- नियुक्ती आदेशापश्चात ०७ दिवसाच्या आत दिलेल्या नियुक्तीच्या ठिकाणी हजर होणेचे आहे व तसा हजर अहवाल तालुका कार्यालयामार्फत जिल्हा कार्यालयास ई मेलव्दारे पाठविणेचा आहे.
- आपण नियुक्ती आदेशानुसार दिलेल्या ठिकाणी विहित मुदतीत हजर न झाल्यास आपण सदर पदावर काम करण्यास इच्छुक नसून आपली जिल्हा कार्यालयाकडे या बाबतची कोणतीही भविष्यात तक्रार असणार नाही व नियमाप्रमाणे प्रतिक्षायादी मधील असणाऱ्या उमेदवारांना पुढील नियुक्ती आदेश दिले जातील.
- योग प्रशिक्षकाला प्रत्येक आठवड्यात कार्यरत आरोग्यवर्धीनी केंद्रामध्ये (प्रा.आ.केंद्र, उपकेंद्र, व नागरी आरोग्यवर्धिनी केंद्रामध्ये) **एक शिबीर किमान २० लाभार्थ्यांच्या उपस्थितीत** आयोजित करावयाचे आहे.
- एकाच दिवशी ०२ पेक्षा जास्त शिबीरे आरोग्यवर्धीनी केंद्रावर आयोजित करता येणार नाही, तसे केल्यास अतिरिक्त शिबीराचे मानधन अदा केले जाणार नाही.
- प्रत्येक शिबिरामागे प्रत्येक योग शिक्षकाला रु.५००/- मानधन प्रा.आ.केंद्र स्तरावरुन शिबिरांच्या संख्येनुसार दिले जाणार आहे.
- ज्या योगशिक्षकांचे वार्षिक मानधन रु.३००००/- पेक्षा जास्त होणार आहे अशा सर्व योगशिक्षकांचे राज्य कार्यालयाच्या पत्रानुसार कलम **Tax Compliance Calender** मधील **Section 194-J** अंतर्गत **आपल्या सेवा येत असल्याने 10 % TDS कपात करण्यात येईल. त्यामुळे भविष्यात या कार्यालयाकडे TDS कपातीविषयी कोणतीही विचारणा करण्यात येऊ नये.**

| जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक<br>जिल्हा परिषद सातारा | जिल्हा आरोग्य अधिकारी<br>जिल्हा परिषद सातारा |
|---|---|